**प्रेसनोट दि.१७/०३/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**छर्रे बंदुकीने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारे दोन आरोपींचा तात्काळ शोध घेवुन केले गजाआड**

---

सिंहगडरोड पो.ठाणे,पुणे गुरनं.२२१/२०९,भा.द.वि.क.३०७,५०४,५०६,३४ मधील फिर्यादी नामे- रोनित देविदास राठोड,वय-२५ वर्षे रा.वैदर्भी सोलर कंपनीजवळ,सदाशिवनगर,दळवीवाडी,नांदेडफाटा, सिंहगडरोड,पुणे यांस दि.१३/०३/२०१९ रोजी २३.३० वा.चे दरम्यान रहाते घराचे ठिकाणी आरोपी नामे- भरत वाघ व प्रसाद शेलार यांनी पुर्वी झालेले वादाचे कारणावरुन फिर्यादी यांना छर्रे मारण्याचे बंदुकीने फायर करुन गंभीररित्या जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेने दि.१४/०३/२०१९ रोजी स.६.५५ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदरचा गुन्हा केल्यानंतर आरोपी पळुन गेलेले होते.

दाखल गुन्हयातील निष्पन्न दोन्ही आरोपी नामे- भरत रमेश वाघ वय-२७ वर्षे रा.बारंगणेमळा, सदाशिवनगर,धायरी,पुणे व प्रसाद कल्याण शेलार रा.सदर यांचा पो.ठाणे कार्यक्षेत्रात ०३ तासांमध्ये शोध घेवुन अटक करण्यात आलेली आहे.आरोपींनी गुन्हयात वापरलेले छर्रे मारण्याचा बंदुक हस्तगत करण्यात आलेले असुन,त्यांची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,ए.सी.कोर्ट,पुणे यांनी दि.१६/०३/२०१९ रोजीपर्यत पोलीस कस्टडी मंजुर केलेली आहे.

श्री.एच.एम.ननावरे,सपोनि, श्री.एस.एस.घाडगे,पोउनि, पोना सुदाम वावरे, पोना.मयुर पतंगे, यांनी आरोपींचा ०३ तासांमध्ये शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणुन उत्तमरित्या कामगिरी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**सिंहगडरोड पो.स्टेशन,पुणे**